**कृपया प्रसिध्दीसाठी -** **29 मे 2012**

## भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी 29 मे 2012 रोजी नागपूर येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *''पेट्रोल दरवाढ - आर्थिक अराजकतेकडे वाटचाल'' - राम नाईक*

**नागपूर, मंगळवार :** ''पेट्रोलची प्रतिलिटर रु.7.50 ने केलेली दरवाढ ही पेट्रोलियमच्या इतिहासातील अभूतपूर्व दरवाढ असून त्यामुळे आर्थिक अराजक माजेल. भाववाढीचे दुष्टचक्र अधिक गतिमान होईल. डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या झालेल्या घसरणीमुळे आगीत तेल पडते आहे. ही दरवाढ मागे घेण्यासाठी भारतीय जनता पार्टीसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (रालोआ) सर्व पक्षांनी जनआंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. गुरुवार 31 मे रोजी जनतेने स्वयंस्फुर्तीने भारत बंद ठेवण्यासाठी सहकार्य करावे'' असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी केले आहे. ते आज नागपूरात पत्रकार परिषदेत बोलत होते.

''भारत सरकारच्या पेट्रोल दरवाढीच्या संवेदनाशून्य निर्णयाला आताच कडाडून विरोध केला नाही तर पाठोपाठ डिझेल, स्वयंपाकाचा गॅस आणि केरोसिन यांच्या दरातही वाढ होऊन सामान्य माणसाचे जीवन हे जनविरोधी सरकार अधिकच खडतर करेल,'' असा इशाराही श्री.राम नाईक यांनी दिला.

पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतीसंबंधी भूमिका स्पष्ट करताना श्री.राम नाईक म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती काही प्रमाणात वाढल्या आहेत हे खरे असले तरी आयात कर आणि अबकारी कर काही प्रमाणात कमी करुन ग्राहकांच्यावरील भाववाढीचा बोजा कमी करता येऊ शकतो. तसे करण्याऐवजी वाढलेल्या किंमतीमुळे येणा-या जास्तीच्या उत्पन्नामध्येच अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जीनां अधिक रस दिसतो आहे. केंद्र सरकारने किंमत वाढीमुळे येणा-या सर्व करांच्या उत्पन्नाचा लाभ ग्राहंकाना विक्रीची किंमत कमी करुन दिला पाहिजे. यालाच इंग्रजीत 'रेव्हेन्यु न्यूट्रल' धोरण असे म्हटले जाते.श्री.अटल बिहारी वाजपेयींच्या काळात असे धोरण अंमलात आणून कर कमी करण्यात आले होते.''

''जगात फक्त भारतातच कच्चे तेल आयात केले जात नसून इतरही अविकसित तसेच विकसित देशामध्ये ते आयात केले जाते. मुंबईत वाढलेला पेट्रोलचा दर प्रतिलिटर रु.78.57 असा आहे तर आपल्या शेजारच्या देशात पेट्रोलचे दर पाकिस्तान रु.59.00 (फरक रु.19.57), श्रीलंका रु.61.70 (फरक रु.16.87) तर बांगलादेश रु.43.40 (फरक रु. 35.17) असे आहेत. विकसित देशातील अमेरिका रु.53.70 (फरक रु.24.87) आणि रशिया रु.50.20 (फरक रु.28.37) यांचे दरही भारतापेक्षा कमी आहेत. त्यामुळे सरकारी करांची पुनर्रचना करुन दरवाढ कमी करणे शक्य आहे,''असेही श्री.राम नाईक म्हणाले.

कच्च्या तेलाच्या आयातीचे प्रमाण पंतप्रधान श्री.वाजपेयी यांच्या काळात 70 टक्के होते ते आता 80 टक्के झाले आहे असे सांगून श्री.राम नाईक म्हणाले,''भारताचे आयातीवरील परावलंबित्व धोकादायक पातळीपेक्षा जास्त वाढत असून ते कमी करण्याबद्दल कोणतीही ठोस पावले डॉ.मनमोहन सिंह सरकारने उचलली नाहीत. श्री.वाजपेयींच्या काळात सामान्य जनतेच्या हितासाठी पाईप गॅस, इथेनॉल, बायोडिझेल आदी योजना सुरु केल्या तर थेट परदेशात जाऊन रशियातील साखालीन तेल क्षेत्रात रु.8,500 कोटी तर सुदानमध्ये रु.3,200 कोटींची गुंतवणूक करुन तेथून भारताच्या मालकीचे तेल येण्यासही सुरुवातही झाली. असा कोणताही नवा उपक्रम डॉ.मनमोहन सिंह यांच्या काळात करण्यात आला नाही. त्याचप्रमाणे वाजपेयी सरकारच्या काळात उत्खननांसाठी योजना आखून कृष्णा-गोदावरी खो-यात नैसर्गिक वायू तर राजस्थानात कच्च्या तेलाच्या साठ्यांचा शोध लावून प्रत्यक्ष उत्पादनासही सुरुवात झाली. गेल्या आठ वर्षात असे कोणतेही मोठे उत्खनन यशस्वी झाले नाही, इतकेच नव्हे तर या दोन्ही ठिकाणच्या उत्पादनात अडथळेच निर्माण झालेले दिसतात.''

''पेट्रोलला पूरक इंधन म्हणून इथेनॉल वापरण्याच्या वाजपेयी सरकारच्या निर्णयावर तर या काँग्रेस सरकारने कुठाराघातच केला. ऊसाच्या मळीपासून इथेनॉल बनवून पेट्रोल मध्ये 5 टक्के मिसळण्याचा ऐतिहासिक निर्णय वाजपेयी सरकारच्या काळात घेऊन त्याच्या विक्रीसही 1 जानेवारी 2003 पासून सुरुवात झाली. त्यानंतरचा टप्पा 10 टक्के इथेनॉल मिसळण्याचा होता. हा निर्णय ऊस उत्पादक शेतक-यांच्या जीवनात संजीवनी ठरणार आहे, असा अभिप्राय उद्घाटनाच्या दिवशी आजचे कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी दिला होता. या निर्णयामुळे बहुमुल्य परदेशी चलन तर वाचणार होतेच परंतु त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे शेतक-यांच्या ऊसाला अधिक भाव मिळून शेतक-यांना आणि कारखान्यांना त्याचा फायदा होणार होता. परंतु वाजपेयी सरकार गेले आणि मनमोहन सिंह सरकार आले. त्या सरकारवर लिकर लॉबीचा दबाव वाढला आणि इथेनॉलची खरेदीच बंद झाली. सात वर्षानंतर आता पुन्हा फेरविचार चालू असल्याचे सांगितले जात आहे. तथापि या काळात शेतक-यांचे, साखर कारखानदारांचे आणि देशाचे जे नुकसान झाले त्याला अर्थतज्ज्ञ असलेले पंतप्रधानच जबाबदार आहेत'' असे प्रतिपादन श्री.राम नाईक यांनी केले.

पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतीबद्दल डॉ.मनमोहन सिंह सरकारकडे स्पष्ट धोरणच नाही असे सांगून श्री.राम नाईक पुढे म्हणाले,''उदारीकरणाच्या नव्या धोरणाप्रमाणे पेट्रोलियम क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी काँग्रेसच्या राज्यात अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंह आणि पंतप्रधान श्री.पी.व्ही.नरसिंहराव यांनी उच्चाधिकार तज्ञ समिती नेमली होती. काँग्रेसचा पाठींबा असलेल्या देवेगौडा सरकारने समितीचा अहवाल स्विकारुन पेट्रोलियम पदार्थावरील नियंत्रण मार्च 2002 पर्यंत टप्प्या - टप्प्यात उठविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार वाजपेयी सरकारने पेट्रोल व डिझेलच्या किंमतीवरील नियंत्रण उठविले. दर 15 दिवसांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार पाहून भारत सरकारच्या तेल कंपन्या ग्राहक विक्रीदरात आवश्यक तो चढ-उतार

करत असत.  परंतु मे 2004 मध्ये मनमोहन सिंह सरकार आले आणि त्यांनी ते धोरणच बदलून सर्वांगिण विचार न करता वेळ मारुन नेण्याचे (ॲड हॉक) निर्णय घेण्यास सुरुवात केली. दोन वर्षापूर्वी म्हणजे जवळ-जवळ सहा वर्षानी जून 2010 मध्ये डॉ.मनमोहन सिंह सरकारने पेट्रोल नियंत्रणमुक्त केले, परंतु डिझेल नियंत्रणातच ठेवले, त्यामुळे पेट्रोलियम क्षेत्रातील गोंधळ अधिकच वाढला. युपीए सरकारच्या काळात तीन पेट्रोलियम मंत्री झाले; सुरुवातीला श्री.मणिशंकर अय्यर, नंतर श्री.मुरली देवरा आणि आता श्री.जयपाल रेड्डी. त्यापैकी कोणत्याच मंत्र्याने स्पष्ट धोरण न आखल्याने या संवेदनशील खात्यात सतत अस्थिरता निर्माण झाली. ''

''पेट्रोलियम पदार्थांच्या सतत वाढत असलेल्या किंमतीमुळे जीवनाश्यक वस्तूंच्या किंमत वाढीच्या दुष्टचक्राला अधिकच गती मिळाली आहे. उदाहरणार्थ मे 2004 मध्ये रु.9 प्रति किलो असलेला गहू मे 2012 मध्ये रु.22 (144%वाढ), तांदूळ रु.10 वरुन रु.24 (140%वाढ), साखर रु.14 वरुन रु.35 (150%वाढ), चहा रु.80 वरुन रु.250 (212%वाढ), गुळ रु.14 वरुन रु.43 (207%वाढ), दुध रु.14 वरुन रु.36 (157%वाढ), तुरडाळ रु.30 वरुन रु.70 (133%वाढ), गोडेतेल रु.40 वरुन रु.98 (145 %वाढ), अशी वाढ झाली आहे.  भाज्या तर भयंकरच कडाडलेल्या आहेत. त्यामुळे आम आदमीने खायचे काय असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे,'' असे श्री.नाईक म्हणाले.

''हे सर्व कमी होते म्हणून की काय रिझर्व्ह बँकेने गेल्या दीड वर्षात 13 वेळा व्याजाचे दर वाढविले तर डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण एप्रिल 2011 मध्ये रु. 44.50 पासून मे 2012 मध्ये रु. 56 पर्यंत म्हणजेच 26 टक्के झाल्यामुळे जनतेच्या हाल अपेष्टांना पारावारच उरला नाही. ही परिस्थिती आम्ही अधिक काळ सहन करणार नाही. पेट्रोल दरवाढ रद्द करा हे डॉ.मनमोहन सिंह सरकारला सांगण्यासाठीच 31 मे च्या भारत बंदची हाक देण्यात आली आहे. जनतेने स्वयंस्फुर्तीने भारत बंद ठेवण्यासाठी सहकार्य करावे,'' असे आवाहनही श्री.राम नाईक यांनी शेवटी केले.

**(कार्यालय सचिव)**